**दिनांक ०६/०६/२०२३**

# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि.०५/०६/२०२३ चे ००.०१ ते २४.०० वा

## खुन

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचे नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे. बडनेरा, अप.नं. ४१४/२३ कलम ३०२, ५०४ भा. दं. वि. | अमरावती | घटना ता वेळा दि. ०५.०६.२३ चे १३.१०वा. माहीती वेळ - दि ०५.०६.२३ चे १७.०० वा. दाखल ता. वेळ - दि. ०५.०६.२३ चे २०.४६ वा. | एक महीला | सिध्दांत डोंगरे रा. अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी ही घरी हजर असतांना शेजारी राहणा-या व्यक्तीने फिर्यादीस सांगितले की तुझ्या नातेवाईकाचे आरोपी सिध्दांत डोंगरे याच्यासोबत भांडण सूरू आहे. अशा माहीतीवरून फिर्यादी नमुद घटना ता .वेळी व ठिकाणी पोहोचली असता यातील आरोपी हा लोखंडी पाईपने फिर्यादीच्या नातेवाईकाच्या डोक्यावर व पायावर मारहाण करतांना दिसुन आला. त्या मारामुळे फिर्यादीचे नातेवाईक खाली पडले व त्यामुळे त्यांच्या डोक्यातुन खुप रक्त निघत होते फिर्यादीच्या नातेवाईकाने आरोपीच्या पायावर थुंकल्याच्या किरकोळ कारणावरून आरोपीने पाईपने फिर्यादीच्या नातेवाईकाला मारहाण केल्याचे फिर्यादीस समजले. फिर्यादीने नातेवाईकांच्या मदतीने तिच्या नातेवाईकास आँटोने इर्विन दवाखाना,अमरावती येथे नेले असता डाँक्टरांनी तपासणी करून फिर्यादीच्या पतीस मृत घोषीत केले.अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून व मेडीकल मेमो वरून सदरचा गुन्हा दाखल केला. |

## घरफोडी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचे नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे खोलापुरी गेट 106/2023 कलम 454, 380 भा.द.वी | शिवशंकर नगर अमरावती | 05.06.2023 चे 07.00 वा ते सायंकाळी 07.30 वा दरम्यान<br><br>दाखल 05.06.2023 चे 22.33 वा | गजेन्द्र सुरेशराव बनकर वय 38 वर्ष रा शिवशंकर नगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हे सकाळी 07.00 वा नातेवाईकाकडे कार्यक्रमाला गेले होते सायंकाळी 07.30 वा घरी परत आले असता त्यांना त्यांचे घराचे कुलुप तुटलेले दिसले आत जावुन पाहीले असता बेडरुम चे फर्नीचरचे ड्रावर मध्ये ठेवलेले नगदी 10,000/- रु कोणीतरी अज्ञात चोराने घराचे दाराचे कुलुप तोडुन आत प्रेवेश करुन चोरुन नेले अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## वाहनचोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचे नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| **१** | **गाडगेनगर अप.क्र. ७७०/२३ कलम ३७९ भा.द.वि.** | **जयंत कम्पलेक्स गाडेगनगर अमरावती** | **दि.०३.०६.२३ चे ०९.०० वा ते १०.००वा दि.०५.०६.२३ चे १७.२१ वा** | **नितीन नरेन्द्र देशमुख रा. राठी नगर अमरावती** | **अज्ञात इसम** | **हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ .ता.वेळी व ठिकाणी यातील फि. चा मुलगा अभिनव शिकवणी वर्गाला गेला असता त्याने त्याची सायकल ज्युनिफायर आलवीन कंपनीचा असुन फेम नं एन२२ए००८५३ असा असुन किं.अं. ७०००/-रु.ची जयंत काम्पलेक्स गाडेगनगर रोड पसेज मध्ये लॉंक करुन ठेवली होती. ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला.** |

## चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचे नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे. राजापेठ अप.क्र ५३२/२०२३ कलम ३७९ भादवि | **रेडीयंट हॉस्पीटल अमरावती** | **दि 20/2/23 चे 16.10 वा**<br>**दि 5/6/23 चे 20.00 वा**<br>**दि 5/6/23 चे 23.14 वा** | मोहन जर्नाधनराव पावडे वय 62 रा रिध्दी सिध्दी अर्पाटमेंन्ट आयुक्तालय समोर कांता नगर अमरावती | दोन संशयीत 1. सीक्युरीटी गार्ड ,2. डॉ अग्रवाल | **हकीकत अश्या प्रकारे आहे कि ,नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी ची मुलगी ही क्रिकेटची प्रॅक्टीस करणे करीता छत्री तलाव येथे ॲटीव्हा गाडी क्र एमएच 27 ए के 7100 ने जात असतांना फी चे मुलगीचे गाडी समोर एक महीला एकदम समोर आल्याने मुलीने ब्रेक दाबला तेव्हा गाडी स्लीप होवुन खाली पडल्याने मार लागला एका ऑटो वाल्याने व महीलेने तिला रेडीयंट हॉस्पीटल येथे भर्ती केले फी चे मुलीचे डोक्याचे स्कॅनींग करतांना स्कॅनींग रुमचे सिसिटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे सिक्युरीटी गार्ड व डॉ अग्रवाल यांनी सांगीतले फी चे मुलीचे गळयातील सोण्याची साखळी चेन वजन 14 ग्रॅम कि अं 70,000 रु ही गळयात दिसुन आली नाही आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही फीचे अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला.** |
| **३** | पो. स्टे सिटी कोतवाली अप न. २४२/२३ कलम ३७९ भादवि | अमरावती | घ ता वेळ दि ३१/०५/२०२३ चे १०.३० वा दरम्यान दा ता वेळ दि ०५/०६/२०२३ चे १९.२६ वा | **एक महीला** | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे नातेवाईकासह त्याचे भासरे यांचे घराचे वास्तु शांती कार्यक्कमा करीता अंजनगाव सुर्जि येथे जाणे करीता अमरावती बस डेपो येथे आले व आर्वि अकोट जााणा—या बस मध्ये बसले बस मध्ये चढत असतांना महीला व पुरूषांची खुप गर्दि होती फिर्यादी कडे मोठी पर्स होती त्यामध्ये नगदी ३०००/—रू पाचशेच्या नोटा असलेली व छोटया लाल रंगाची पर्समध्ये सोन्याचे छोटे मंगलसुत्र वजन १० ग्रॅम चे ठेवले होते फिर्यादी बसमध्ये चढल्यानंतर बस दर्यापुरचे जवळपास गेल्यावर फिर्यादीस पर्स ची चैन उघडलेली दिसली तेव्हा फिर्यादिने पर्स मध्ये चेक केले असता पर्स मधील नगदी ३०००/— रू ,सोन्याचे छोटे मंगळसुत्र.वजर १० ग्रॅम किंमत ४४०००/— रू व रिअल मी सी २५ वाय मोबाईल किंमत ११९९९/— रू असा एकूण ५८९९९/— रू चा माल कोणी तरी अज्ञात चोराने अमरावती बस डेपो येथे बस मध्ये चढत असंतांना गर्दीचा फायदा घेवुन चोरी केली आहे असे समजले अशा फिर्यादिचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल **केला.** |

इतर

| अ.क्र . | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १२ |
| १. | फ्रेजरपुरा अम शहर अप क्र ४००/२०२३ कलम २८५ भादवि | प्रशांत नगर गार्डन जवळ अमरावती | दि.०५/०६/२०२३ चे २१.३० वा<br><br>दा ता वेळ दि.०५/०६/२०२३ चे २३.१८ वा. | सरतर्फे पोहवा सुनिल मानिकराव सोळंके ब नं २८९ पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर | प्रमोद प्रभाकर रहाटे वय ४२ वर्ष रा प्रशांत नगर हनुमान मंदिराजवळ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, दि.०५/०६/२०२३ चे २१.०० वा ते ०८.०० वा पावेतो पेट्रोलींग ड्युटी करीत असताना चायनिज हात गाडी मुख्य रस्त्यावर २१.३० वा एका चालकाने त्याच्या ताब्यातील हॉटेल समोरील हातगाडीवर सार्वजनिक रस्त्यावर येणा-या जाणा-या लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे दिसुन आला नमुद आरोपी त्याच्या ताब्यातील गॅस सिलेंडर सार्वजनिक रोडवर येणा-या जाणा-या लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने वापर करीता होता, नमुद आरोपीचे कृत्य अतिशय निष्काळजीपणाचे असुन त्याचे विरुद्ध फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. लागलिच दाखल<br>पोहवा प्रेमराव वानखडे ब नं ८०७, २८९ पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर |
| २. | गाडेगनगर अप.क्र. ७६९/२३ कलम २९४ भा.द.वि. | अमरावती | दि.२२.०५.२३ चे १६.३० वा .<br><br>दाखल दि. ०५.०६.२३ चे १७.०१वा | एक महीला | एम.एच-२७-बीई-४३९० चा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ .ता.वेळी व ठिकाणी फि.हे डिमार्ट मध्ये खरेदी करीता गेले असता फि.ची चारचाकी गाडी ही मागुन एक चारचाकी क्र. एम.एच-२७-बी.ई-४३९० ही आली असुन त्याला धक्का दिली असुन त्याला धक्का लागल्या ने फि.ने त्या चालकास माफी मागितली असता परंतु आरोपीने काही न एकता अश्लील भाषेत यांना गाड्या कशाला चालविण्याकरीता देतात .माणुस असता तर कानाखाली मारली असती .गाडया घेवुन मुजरा करतात .नमुद वाहन चालकाने फि.स सार्वजनिक ठिकाणी अश्लील शिवीगाळ केली .फि.हे कामानिमित्त बाहेर गावी गेली होती आज रोजी परत आल्यानंतर पो.स्टे.ला रिपोर्ट देण्याकरीता आले. अशा फि.चे रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ३. | गाडेगनगर अप.क्र. ७६८/२३ कलम २९४ भा.द.वि. | कृष्णकुंज कालनी अमरावती | दि. ०१.०४.२०२३ ते आजपावेतो<br><br>दाखल ता वेळ ०५.०६.२०२३ चे १६.१७ वा दरम्यान | अरुण राजाराम पाटील वय ५४ वर्ष. रा. प्रभुदास कालनी महादेव खोरी रोड अमरावती | प्रविण कृष्णराव चावजी वय ५४ वर्ष रा.तपोवन कृष्णकुंज कॉंलनी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि.हे. नमुद हाटेल वर कामाकरीता जात नसुन सद्या खाली आहे. आज दि. ५.०६.२३ रोजी फि.हे आठ महिन्यांचे वेतन मागण्यासाठी गेलो असता आरोपी घरी नसल्याने तेव्हा फि.ने मो.क्रं. फोन वरुन त्याचे मो.क्र. वर वेळ १०.१६ सायकांळी दरम्यान आज रोजी केला तेव्हा त्यानी फिचे हाटेल मध्ये काम करण्याचे पैशे मागितले असता पैशे दिले नाही तुझ्याने जे उपडुन जमा करता येते ते करुन घे. अशा अश्लिल शिवीगाळ फोनवर आरोपीने फि.ला दिली.आरोपीचा फि.ला नेहमिचा त्रास असुन आरोपीने फि.ला अश्लील शिवीगाळ करीत असतात. आज रोजी पुन्हा अश्लील शिवीगाळ केली. अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ४. | पो. स्टे. राजापेठ अपक्र. ५३३/२०२३ कलम २७२,२७३, १७९,१८८ भादवी सहकलम २६(१),२६(२)(iv),२७(३)(e),३०(२)(a), | साई पान सेंटर फरशी स्टॉप अमरावती | दि 5/6/23 चे 19.00 वा<br><br>दि 5/6/23 चे 18.00 वा<br><br>दि 5/6/23 चे 23.36 वा | सरतर्फे पोउपनि राहुल महाजन पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर | विजय विठठल राउत वय 40 रा चैतन्य कॉलनी | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी स्टापसह मिळालेल्या माहितीवर रेड केली असता यातील नमुद आरोपी याचे ताब्यातुन 11 पॅकेट विमल झीपर कि 550, 2. नजर छोटी 40 नग कि 160 रु , पान पराग 36 नग कि 144 रु असा चा माल मिळुन आला आहे. जप्त मालामधुन प्रत्येकी एक पाकीट विश्लेषणाकरीता नमुद स्वरूपात वेगळे काढुन घेण्यासाठी अन्न व औषधी प्रशासनाला पत्र देत आहोत. सॅम्पल काढुन तपासणीसाठी पाठवीत आहोत. नमुद आरोपीने सदर प्रतीबंधीत अन्न पदार्थ खाल्यास मानवी जिवीतास अपाय होवुन इजा होवु शकते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने सदर पदार्थ प्रतीबंधीत केलेले आहेत. परंतु सदर इसम हा आपल्या फायद्यासाठी सदर प्रतीबंधीत पदार्थाची अवैध्दरित्या विक्री करण्याकरीता साठवणुक करतांना मिळुन आला. नमुद इसमास पुरवठादाराबाबत विचारपुस केली असता उडवाउडवीचे उत्तरे दिली. सदर अन्न पदार्थ हे मानवी आरोग्यास अत्यंत घातक असुन त्याचे सेवनाने कर्करोगासारखे दुर्धर आजार होवु शकतात म्हणुन शासनाने यावर निर्बंध घातलेला आहे. हे पुर्णपणे ज्ञात असतांना सदर इसमाने प्रतीबंधीत पदार्थाचा विक्री करीता साठा केला वरून सदर इसमाचे कृत्य कलम २७२,२७३,१७९,१८८ भादवी सहकलम २६(१), २६(२)(iv), २७(३)(e),३०(२)(a),५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ प्रमाणे गुन्हा होत असल्याने अशा फिर्यादीचे लेखीरिपोर्ट वरून DO |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ | | | | | आदेशाने सदरचा गुन्हा दाखल केला. |
| **५.** | पो. स्टे. राजापेठ अपक्र. ५३४/२०२३ कलम २७२,२७३, १७९,१८८ भादवी सहकलम २६(१),२६(२)(iv),२७(३)(e),३०(२)(a), ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ | **जय महाराष्ट्र पान सेंटर फरशी स्टॉप अमरावती** | **दि 5/6/23 चे 18.00 वा**<br>**दि 5/6/23 चे 17.15 वा**<br>**दि 5/6/23 चे 23.44 वा** | सरतर्फे पोउपनि राहुल महाजन पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर | पवन शिवनारायण जयस्वल वय 40 रा जलाराम नगर गल्ली क्र 1 अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी स्टापसह मिळालेल्या माहितीवर रेड केली असता यातील नमुद आरोपी याचे ताब्यातुन 19 पॅकेट विमल झीपर कि 760 2. 99 पाउच पान पराग प्रिमीयम कि 495 रु असा एकुण 1255 रु चा माल असा चा माल मिळुन आला आहे. जप्त मालामधुन प्रत्येकी एक पाकीट विश्लेषणाकरीता नमुद स्वरूपात वेगळे काढुन घेण्यासाठी अन्न व औषधी प्रशासनाला पत्र देत आहोत. सॅम्पल काढुन तपासणीसाठी पाठवीत आहोत. नमुद आरोपीने सदर प्रतीबंधीत अन्न पदार्थ खाल्यास मानवी जिवीतास अपाय होवुन इजा होवु शकते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने सदर पदार्थ प्रतीबंधीत केलेले आहेत. परंतु सदर इसम हा आपल्या फायद्यासाठी सदर प्रतीबंधीत पदार्थाची अवैध्दरित्या विक्री करण्याकरीता साठवणुक करतांना मिळुन आला. नमुद इसमास पुरवठादाराबाबत विचारपुस केली असता उडवाउडवीचे उत्तरे दिली. सदर अन्न पदार्थ हे मानवी आरोग्यास अत्यंत घातक असुन त्याचे सेवनाने कर्करोगासारखे दुर्धर आजार होवु शकतात म्हणुन शासनाने यावर निर्बंध घातलेला आहे. हे पुर्णपणे ज्ञात असतांना सदर इसमाने प्रतीबंधीत पदार्थाचा विक्री करीता साठा केला वरून सदर इसमाचे कृत्य कलम २७२,२७३,१७९,१८८ भादवी सहकलम २६(१), २६(२)(iv), २७(३)(e),३०(२)(a),५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ प्रमाणे गुन्हा होत असल्याने अशा फिर्यादीचे लेखीरिपोर्ट वरून DO आदेशाने सदरचा गुन्हा दाखल केला. |

## जुगार

| **अ. क्र.** | **पो.ठाणे** | **गु.र. नं. व कलम** | **गुन्हा घडला ठिकाण** | **गुन्हा घडला ता.वेळ** | **गुन्हा दा. ता.वेळ** | **फिर्यादी नांव पत्ता व वय** | **अटक/पाहिजे आरोपीचे नांव** | **हकीकत** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **१२** |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर** | अप क्र 398/2023 कलम 12 अ म जु का | सुदर्शन नगर फ्रेजरपुरा अमरावती | दि.05/06/2023 चे 13.35 वा. | दि.05/06/2023 चे 16.22 वा | सरतर्फे पोहेकॉ योगेश श्रीवास ब नं 1015 पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर | 1.दिनेश किशोर गवतेल रा सुदर्शन नगर फ्रेजरपुरा अमरावती 2.प्रमोद वासुदेवराव वरघट वय 62 वर्ष रा सुंदरलाल चौक चपराशीपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि हे पो स्टे हद्दीमध्ये पेट्रोलींग करीत असताना फि ला गुप्त बातमीदाराकडुन खबर मिळाली वरुन नमुद आरोपीत इसम यांचे वर अवैद्य जुगार रेड केली असता त्याचे ताब्यातुन वरली मटका आकडे लिहीलेल्या एकुण 1 चिठ्ठी , नगदी 330/-रु, एक निळया शाईचा बॉलपेन किं 5/-रु असाएकुण 335/-रु चा माल जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आला अशाफि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा रिपोर्ट दाखल केला. |
| २ | **पो.स्टे फ्रेजरपुरा अम.शहर** | अप क्र 399/2023 कलम 12 अ म जु का | लुबिनी नगर कुंभारवाडा जावेद किराणा जवळ जेवड नगर अमरावती | दि.05/06/2023 चे 14.40 वा | दि.05/06/2023 चे 17.23 वा. | सरतर्फे पोहेकॉ योगेश श्रीवास ब नं 1015 पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर | शेख आसिफ वल्द शेख साबिर वय 20 वर्ष रा अलामगिर मस्जिद जवळ फ्रेजरपुरा अमरावती गजानन प्रल्हादराव काळबांडे वय 35 वर्ष रा शादानी किराणा जवळ जेवड नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी हे पो स्टे फ्रेजरपुरा येथे तैनासित असुन वरिष्ठांचे आदेशाने पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक खबर मिळाली वरुन नमुद घटना ता वेळी नमुद आरोपी इसम याचेवर जुगार रेड केली असता त्याचे ताब्यातुन वरली मटका आकडे लीहीलेला एकुण 2 कागदी चिठ्ठी, नगदी 1150/-रु व एक निळया शाईचा बॉलपेन किं अं 5/-रु असा एकुण 1155/-रु चा जुगार माल जप्ती पंचनामाप्रमाणे जप्त करण्यात आला. अशा फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा रिपोर्ट दाखल केला. |
| ३ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती | अप क्र २७१/२३ कलम १२(अ) मजुका | अकबर नगर नाल्याजवळ मोकळ्या जागेत अमरावती | दि.०५/०६/२०२३ चे १४.१५ वा दरम्याण | दि. ०५/०६/२०२३ चे १६.२२ वा | सरतर्फे पोहेकॉं संतोष रामलाल यादव ब.न.१८८ पो.स्टे नागेट अमरावती | १)दत्ता प्रल्हादराव शेगोकार वय-५४ वर्षे रा.नवाथे नगर, २)सैय्यद शकील सै. यासिन वय-३३ रा फातीमा नगर | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी याने पोलीस स्टॉप व पंचासक्ष मिळालेल्या गुप्त माहीतीवरुन जुगार रेड केली असता यातील नमुद आरोपी यांचे ताब्यातुन वरली मटका जुगार खेळाचे २००० रु वरली मटक्याचा चिठ्या, दोन बॉंल पेन किमंत २० रु असा एकुण २०२० रुपये चे माल मिळुन आला वरुन नमुद आरोपीचे हे कृत्य कलम १२(अ)मजुका प्रमाने होत असुन फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती | अप क्र २७२/२३ कलम १२(अ) मजुका | पठाण चौक जिब्राईल बाबा दुर्गाजवळ मोकळ्या जागेत अमरावती | दि.०५/०६/२०२३ चे १४.३०वा दरम्याण | दि. ०५/०६/२०२३ चे १६.५६ वा | सरतर्फे पोहेकाँ संतोष रामलाल यादव ब.न.१८८ पो.स्टे नागेट अमरावती | १)अब्दुल शरीफ अ.रफिक वय-३३ रा.कमेला ग्राउंड २)मनोज मुकुंदराव सरोदे वय-५५ रा ज्योती कॉलनी, ३)आसीफ खान अताउल्ला खान वय-३८ रा.लालखडी, ४)मो.सलीम मो.हनिफ वय- ५२ रा.हिम्मत नगर,५)प्रल्हाद रामाजी उईके वय-५३ रा.कुंडसर्जापुर, + ५ ११)नसरोद्दीन उर्फ राजा - निजामोद्दीन वय-३२ रा.नागपुरी गेट | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी याने पोलीस स्टॉप व पंचासक्ष मिळालेल्या गुप्त माहीतीवरुन जुगार रेड केली असता यातील नमुद आरोपी यांचे ताब्यातुन वरली मटका जुगार खेळाचे १६९०० रु वरली मटक्याचा चिठ्या, असा एकुण १६९०० रुपये चे माल मिळुन आला तसेच आरोपी नामे नसरोद्दीन उर्फ राजा निजामोद्दीन हा पोलिसांची चाहुल लागताच पळुन गेला,वरुन नमुद आरोपीचे हे कृत्य कलम १२(अ)मजुका प्रमाने होत असुन फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ५ | वलगाव | १८०/२०२३ कलम १२ (अ) म.जु.का. | गणेडावाल लेआऊट चांदुर बाजार फाटा वलगाव | दि.०५/०६/२०२३ चे २०/०० वा. | दि.०५/०६/२०२३ चे | ASI प्रदिप सावकर ब.न.१६ पोस्टे वलगाव अमरावती शहर. | १)नरेश पुंडलीकराव कलाने वय ४४ वर्ष<br><br>२) जिवन् वसंतराव भुसाटे वय ३९ वर्ष<br><br>३) विठ्ठल भानुदास वानखडे वय ३० वर्ष<br><br>४) दिपक देविदास सांतगे वय ३८ वर्ष<br><br>५) सुनिल मोतीराम अग्रवाल वय ५५ वर्ष<br><br>६)गणेश नामदेवराव मालवे वय ५० वर्ष सर्व रा.वलगाव ता.जि.अमरावती. | हकिकत आशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील फिर्यादी यांची दि.०५/०६/२०२३ रोजी नाईट डी.ओ.ड्युटी असताना.मा.सिपी काँड यांना गुप्त बातमी दारा कडुन माहीती मीळाली की गेणेडीवाल लेआउट चांदुर बाजार फाटा वलगाव येथे सर्व जनीक ठीकानी काही इसम जुगाराचा ५२ ताज पत्त चा जुगार पैसे घेवुन हारजीतचा खेळ खेळन पैसे कमावित आहे.अशा माहीती सिपी स्कॉड व पो स्टॉफ सह सदर घटनास्थळाव गपत छपत गेलो असता.काही इसम हे ५२ पत्ते चा खेळ खेळत आहे व काही ईसम हे वरली मटका नावाचा पैसे घेवुन खेळ खेळवित आहे.पोस्टे व सिपि काँड सह लपत छपत गेलो ्असता.सदर आरोपिना जागीच पकडे व त्याची पंचासमक्ष अंगझडी घेतली त्याचे ताव्यातुन 1)नगदि ४०४०/रु २) दोन छोटे मोबाईल (आँन्डाईड ) कि.अ.२०,०००/रु ३) दोन छोटे मोबाईल कि.अ.३,०००/रु असा एकुन २७,०४० /रु चा माल जप्तकेला. सदर आरोपिचे कुत्य कलम १२ (अ) म.दा.का.प्रमाने होत असल्याने.सदर फिर्यादिच्या लेखी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल केला. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | खोलापुरी गेट | 105/2023 कलम 12 अ, मजुका | सक्कर साथ अमरावती | 05.06.2023 चे 17.30 वा | दाखल 05.06.2023 चे 20.42 वा | सर तर्फे HC राजेन्द्र माणिकराव काळे ब. नं 853 गुन्हे शाखा अमरावती शहर | मनिष रामदास मानेकर वय 42 वर्ष रा. जुना सराफा शनि मंदीर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो स्टॉफ सह पोलीस आयुक्त हद्दीत पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमी दारा कुढुन खात्री लायक माहीती वरुन सक्कर साथ येथे जुगार रेड केली असता चिठ्या लावणारे लोक पोलीसांची चाहुल लागताचा पडुन गेले व पैसे घेवुन चिठ्या घेणारा इसम जागीच मिळुन आला त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव मनिष रामदास मानेकर वय 42 वर्ष रा जुना सराफा शनि मंदीर अम असे सांगीतले पंचा समक्ष ताब्यात घेवुन त्याचा पासुन वरली मटका चिठ्या व नगदी जुगाराचे 970 रु व 5/- रु पेन असा माल जप्त करुन फिर्यादी च्या लेखी रिपोर्ट सदरचा गुन्हा दाखल केला. |

## अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | राजापेठ मर्ग क्र ५७/२३ कलम १७४ जाफौ | अमरावती<br>दि 10/5/23 चे 20.30 वा<br>दि 5/6/23 चे 21.58 वा | एक महीला | सर तर्फे पोहेका देवेंद्र ब ंन 3935 नेमनुक मेडी. बुथ पोस्टे अजनी नागपुर | रेल्वे क्रॉसींगवर रेल्वेचा डोक्याला मार लागुन जखमी झाल्याने उपचारा दरम्यान मरण पावली | यातील मयत ही नमुद घ ता वेळी व ठीकाणी पायदळ घरी येत असतांना राजापेठ रेल्वे क्रॉसींगवर रेल्वे आल्याने डोक्याला मार लागुन जखमी झाल्याने प्रथमउपचार कामी सरकारी दवाखाना अमरावती येथे भर्तीकेले नंतर रेफर नागपुर मेडीकल येथे केल्याने दि 11/5/23 रोजी भर्ती केले व दि 13/5/23 रोजी 21.30 वा उपचारा दरम्यान मरण पावली असुन मा पोउपायुक्त परी-1 अम यांचे पत्र क्र आर/सीबी /अक मृ वर्ग /1036/2023 दि 3/6/23 अन्वये आज रोजी मर्ग डायरी प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला | तपास व दाखल अधिकारी - पोहेका निलेश वानखडे ब नं 880 पो. स्टे. राजापेठ अमरवती |